MHSN120002962013

**दाखल दिनांक – १०.०५.२०१३**
**नोंदणी दिनांक – १०.०५.२०१३**
**निकाल दिनांक – ०१.०७.२०२६**
**कालावधी – १३ वर्षे, ०१ महिना, २१ दिवस.**

**पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.४०/२०१३**

**नि.क्र.**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार** तर्फे – पोलीस निरीक्षक, **पलूस पोलीस ठाणे.** |
| **अभियोग पक्षातर्फे** | श्री.आर.आर. चांगण, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| | विरूध्द |
| **आरोपी** | **१. पृथ्वीराज यशवंत पाटील,** वय – २० वर्षे, धंदा – शिक्षण, **२. सुहास अशोक पाटील,** वय – २६ वर्षे, धंदा – शेती, **३. निलेश व्यंकटराव पाटील,** वय – २३ वर्षे, धंदा – शेती, **४. अभिजीत उर्फ धनाजी मोहन पाटील,** वय – २७ वर्षे, धंदा – शेती, **५. सचिन आप्पासाो. पाटील,** वय – ३३ वर्षे, धंदा – शेती, **६. प्रदीप सुभाष पाटील,** वय – २४ वर्षे, धंदा – शेती, सर्व रा.भिलवडी, ता.पलूस, जि.सांगली. |
| **आरोपींतर्फे वकील** | श्री.एम.एम. मुळे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | २७.०३.२०१३ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ३२/२०१३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १०.०५.२०१३ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १०.०५.२०१३ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | ०२.०९.२०१३ |
| युक्तिवाद दिनांक | | २४.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०१.०७.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु–क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा–तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.क. ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | पृथ्वीराज यशवंत पाटील,<br>सुहास अशोक पाटील,<br>निलेश व्यंकटराव पाटील,<br>अभिजीत उर्फ धनाजी | आरोपींना दि.०१.०४.२०१३ रोजी फौ. प्र.सं.क. ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस | ०१.०४.२०१३ | भा.दं.वि.सं .चे क.१४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मोहन पाटील, | | | | | | |
| ५. | सचिन आप्पासाो. पाटील, | | | | | | |
| ६. | प्रदीप सुभाष पाटील, | | | | | | |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | श्रीकांत मारुती निकम | ५१ | फिर्यादी |
| २. | तानाजी केरु भोई | ६५ | घटनास्थळ पंच |
| ३. | प्रकाश आनंदा माळी | ६७ | जप्ती पंच |
| ४. | सुहास महादेव कुलकर्णी | १२९ | जप्ती पंच |
| ५. | अजय ज्ञानदेव पाटील | १३४ | जप्ती पंच |
| ६. | पवन वसंत निकम | १३५ | साक्षीदार |
| ७. | विक्रम पांडुरंग निकम | १४१ | साक्षीदार |
| ८. | चंद्रकांत आंतु खरमाटे | १४४ | तपासीक अंमलदार |
| ९. | मधुकर आनंदा गायकवाड | १५४ | तपासीक अंमलदार |
| १०. | डॉ.अर्चना विरेंद्रसिंग पवार | १५८ | वैद्यकीय अधिकारी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.५२ | फिर्याद |
| २. | नि.६६ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | नि.१३० | सीडी व पेनड्राईव्ह जप्ती पंचनामा |
| ४. | नि.१३६ | भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५-ब चे प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ५. | नि.१४५ | गुन्हा तपास करण्याचा लेखी आदेश |
| ६. | नि.१४६ | दि.२७.०३.२०१३ रोजीची फिर्यादीने दिलेली एन.सी. |
| ७. | नि.१४७ | संग्राम पाटील यांनी दिलेली एन.सी. |
| ८. | नि.१४८ | साक्षीदार विक्रम पांडुरंग निकम याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग |
| ९. | नि.१४९ | डॉ.पवार यांना दिलेले पत्र |
| १०. | नि.१५० व १५१ | वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करण्याकरिता दिलेले पत्र |
| ११. | नि.१५२ व १५३ | मुद्देमाल पावती |
| १२. | नि.१५५ | कलम वाढ करण्याचा अहवाल |
| १३. | नि.१५६ | मालमत्ता क्र.१८६२ चा ८/अ च्या उताराची प्रत |
| १४. | नि.१५९ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**– न्यायनिर्णय –**

**(घोषणा तारीख– ०१.०७.२०२६)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भा.दं.वि.सं.कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३, ५०६ सह कलम १४९ या अपराधांसाठी चालविण्यात आला.

**प्रस्तुत खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की –**

**२.** फिर्यादी श्रीकांत मारुती निकम यांनी दिनांक २७.०३.२०१३ रोजी फिर्याद देवून असे कथन केले की, दि.२७.०३.२०१३ रोजी घरातील जनावरांना वैरण पाणी करुन सकाळी ८–३० वाजता धुळवड असल्याने मटन आणणेकरिता पळशीकर यांच्या दुकानात गेले होते, दुकानात गर्दी असल्याने ते, त्यांचा पुतण्या पवन याच्या किराणा मालाच्या दुकानात थांबले होते. ९–०० वाजण्याच्या सुमारास अचानक आरोपी त्याठिकाणी आले व त्यांनी 'तुला मस्ती आली आहे, तुला बघतो, तुला जिवंत ठेवत नाही' असे सांगून हाताने, पायाने, काठीने मारहाण केली, छातीच्या उजव्या बाजुस मारहाण केली. त्यामुळे त्यांच्या उजव्या बाजुस, डोक्याच्या खालील बाजुस मार लागला. त्यांना उजव्या खांद्यावर,

पाठीवर, पोटाच्या डाव्या साईडला मारहाण केली त्यांच्या दोन्ही मांडीला मुका मार लागला. आरोपींनी त्याला 'तु गावाचे पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन का अडवलीस आणि तु धुळवडीची राख उधळलेली आमचे मुलांना का विचारलेस' असे सांगितले. निलेश व्यकंट पाटील याने काठीने मारहाण केली व नंतर त्याच्या हातातील काठी धनाजी पवार याने घेवून त्याच्या दोन्ही खांद्यावर, उजव्या बरगडी व हातावर मारहाण केली. सचिन आप्पासाो पाटील याने 'त्याला जिवंत सोडू नका' असे म्हणून मारहाण केली व त्याला फरफटत रस्त्यावर नेले. म्हणून प्रस्तुत फिर्यादवरुन गुन्हा नोंद करण्यात आला.

**३.** सदर फिर्यादवरुन आरोपींविरुध्द गु.र.क्र.३२/२०१३ भा.दं.वि.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल ब.नं.८८७ एम.ए. गायकवाड यांनी केला. तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भा.दं.वि.सं. १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३, ५०६ सह कलम १४९ अन्वये निशाणी क्र.३६ वर दोषारोप नोंदविले. त्यातील मजकुर आरोपींना बोली भाषेमध्ये वाचुन दाखवले. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. अभिलेखावर आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आल्यामुळे आरोपींचे फौ.प्र. संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले असता नकारार्थी उत्तरे देवून त्यांच्या विरोधात राजकारणातून व पाणी पुरवठ्याच्या स्कीमला विरोध करण्याच्या उद्देशाने त्रास देण्यासाठी खोटी केस केली असल्याचे कथन केले आहे.

**५.** अभियोगपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.आर. चांगण व आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एम.एम. मुळे यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे विधींनी त्यांचा लेखी युक्तीवाद नि.क्र.१८० वर सादर केला. खालील मुद्दे निर्णीती करिता उद्भवतात. त्या मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे –

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २७.०३.२०१३ रोजी ९–०० वाजण्याच्या सुमारास भिलवडी गावी, भिलवडी ते तासगांव जाणारे डांबरी रोडचे पुर्व बाजुस असलेल्या निकम शॉपीमध्ये, ता.पलूस, जि.सांगली येथे आरोपींनी जमावाच्या सामुहीक उद्देशाकरिता बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचे घटक बनले व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम १४३ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| २. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी जमावाच्या सामुहीक उद्देशाच्या पुर्ततेसाठी दंगा केला व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम १४७ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ३. | उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी जमावाच्या सामुहीक उद्देशाकरिता बेकायदेशीर जमावाचा घटक होवुन लाकडी दांडके सारख्या घातक हत्यारासह मिळुन आले व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम १४८ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ४. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, सर्व आरोपींनी जमावाच्या समान उद्देशाने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून साधी दुखापत केली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३२३ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ५. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, सर्व आरोपींनी जमावाच्या समान उद्देशाने फिर्यादीस लाकडी दांडक्याने मारहाण करून गंभीर दुखापत केली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३२४ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ६. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी समान उद्दिष्टाच्या पुतर्ततेकरिता गैरकायद्याची जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारास लोखंडी सळी व लाकडी काठीने मारहाण करुन | **नकारार्थी...** |

| | | |
|---|---|---|
| | इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहोचवली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ३२६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | |
| ७. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी सर्व आरोपींनी जमावाच्या समान उद्देशाने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली व दमदाटी केली व त्याअन्वये आरोपींनी भा.दं.वि.चे कलम ५०६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ८. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## युक्तीवाद

६. सहाय्यक सरकारी वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. साक्षीदार क्र.१ याने फिर्याद सिध्द केली असून अभियोग पक्षाने साक्षीपुराव्यादरम्यान जप्ती पंचनामे, घटनास्थळ पंचनामा सिध्द केला असून वैद्यकीय अधिकरी यांच्या साक्षीदरम्यान फिर्यादीस झालेल्या जखम देखील अभियोग पक्षाने सिध्द केले आहे. अभियोग पक्षाने पुराव्यानिशी आरोपीवरील दोषारोप सिध्द केला असल्याने आरोपींना शिक्षा देण्याची विनंती केली आहे.

७. आरोपीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, अभियोग पक्षाचे साक्षीदारांची साक्ष संशयापलीकडे ग्राह्य धरणे योग्य नाही. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्याकरिता कोणताही पुरावा पटलावर सादर केला नाही त्यामुळे आरोपी हे गुन्ह्यातून निर्दोष होण्यास पात्र असल्याने त्यांची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती केली आहे. त्यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिवाड्यावर भिस्त ठेवली आहे.

*1. Yuvraj Pundalik Gadhave Vs. Maharashtra state Electricity Board Dhule, 2011 ALL MR(Cri.) 1521 wherein Hon'ble Bombay High Court Bench at Aurangabad observed that in criminal matter strict standard of proof is required.*

*2. State of Maharashtra Vs. Pralhad S/o. Champatrao Deshbhratar 2005 (1) Mh. L.j. 784 wherein Hon'ble Bombay High Court observed that testimony of interested witness cannot be discarded only on the ground that he is interested witness, however testimony of such witness has to be scrutinized with great care and caution.*

*3. Faijal Hamidkhan Noor Vs. State of Maharashtra 2011 ALL MR (Cri.) 705 wherein Hon'ble High Court Bench at Aurangabad observed that recovery of alleged weapon at the instance of appellant appears to be concocted and afterthought, role of accused in commission of offence cannot be segregated, in such circumstances conviction cannot be granted.*

*4. Devendara @ Bittya Bhausaheb Padale and another Vs. State of Maharashtra, 2016 All MR (Cri.) 2397 wherein Hon'ble Bombay High Court observed that no evidence to show that the weapons seized at the behest of accused, were sealed in presence of panchas, in such circumstances prosecution did not establish guilt of accused beyond reasonable doubt.*

*5. Kali Ram Vs. State of Haryana, 1973 DGLS (soft) 287 wherein Hon'ble Supreme Court of India observed that an innocent person is sent to jail and undergoes the sentence, the scars left by the miscarriage of justice cannot be erased by any subsequent act of expiation.*

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ ते ७ बाबत –**

८. वरील सर्व मुद्दयांवर एकत्रितरित्या पुरावा आल्याने व सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदरचे मुद्दे चर्चेकरिता एकत्रित घेण्यात आले आहेत.

९. आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षास आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून त्यांच्या जमावाच्या समान उद्दिष्ट

पुर्ततेकरिता फिर्यादीस लाकडी दांडक्याने मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहोचविली, जिवे मारण्याची धमकी दिली याबाबी सिध्द करणे आवश्यक होते. सदरच्या बाबी सिध्द करण्याच्या दृष्टीने अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ श्रीकांत निकम याची साक्ष पटलावर नोंदविली आहे. त्याने त्याच्या साक्षीत घटना दि.२७.०३.२०१३ रोजी सकाळी ८–३० ते ८–४५ वाजण्याच्या सुमारास भिलवडी येथील तासगांव–कोल्हापूर मेन रोडवरील त्याचा पुतण्या पवनच्या निकम शॉपीमध्ये घडली. त्यावेळेस सर्व आरोपी त्याठिकाणी आले व त्यांनी 'तुला मस्ती आली आहे का, तुला जिवंत ठेवत नाही, तुला बघून घेतो' असे सांगून मारहाण करायला सुरुवात केली. आरोपी पृथ्वीराज याने तोंडावर बुक्की मारली, आरोपी अभिजीत व निलेश यांनी दांडक्याने उजव्या बरगडीवर, पाठीवर, पायावर, दोन्ही हातावर मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी दुकानातून ओढत बाहेर आणले व त्याला लाथाबुक्क्यांनी व काठ्यांनी मारहाण केली त्यावेळेस त्याच्या उजव्या डोळ्याच्या खाली दुखापत झाली. त्यानंतर तो त्याच्या पुतण्यासोबत पोलीस ठाणेत येवून निशाणी क्र.५२ प्रमाणे फिर्याद दिली. त्याने सरकारी दवाखाना पलूस, सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे उपचार घेतला, त्याचा सांगली सिव्हील हॉस्पीटलमध्ये जबाब नोंदविला त्यानंतर दि.३०.०३.२०१३ रोजी पोलीसांनी त्याचा पुरवणी जबाब नोंदविला असल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने जप्त मुद्देमाल काठी ही ज्या काठीने मारहाण करण्यात आली ती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा स्कीमसाठी त्याच्या शेतातून पाईपलाईन जात होती त्यामुळे त्याने काम बंद पाडले असल्याचे मान्य केले आहे.

**१०.** सदर साक्षीदाराने तथाकथित घटनेबाबत व आरोपींनी त्याला काठीने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याबाबत कथन केले आहे तसेच, त्याने त्याच्या साक्षीदरम्यान फिर्याद नि.क्र.५२ प्रमाणे सिध्द केली आहे परंतु, त्याने त्याच्यासाक्षीदरम्यान आरोपी हे त्याच्या विरोधी राजकीय गटाचे असल्याचे व त्याने पाणी पुरवठा स्कीमची पाईपलाईन त्याच्या शेतातून जात असल्याने त्याचे काम बंद पाडले असल्याची बाब स्पष्टपणे उलटपासादरम्यान मान्य केली आहे तसेच सदर साक्षीदाराने तथकथित जप्त काठीने मारहाण करण्यात आली नसल्याची बाब त्याच्या साक्षीदरम्यान कथन केले आहे. सदर साक्षीदाराच्या

साक्षीवरुन आरोपी व फिर्यादी हे विरोधी राजकीय गटाचे असल्याबाबत व पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईनवरुन त्यांच्यात वाद असल्याची बाब स्पष्ट होत आहे त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष पटलावरील इतर पुराव्याशी संलग्नीत करुन विचारात घेणे न्यायोचित होईल.

**११.** अभियोग पक्षाने तथाकथित घटना सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.६ पवन वसंत निकम यांची साक्ष पटलावर नोंदविली आहे. त्याने त्याच्या साक्षीत घटना ही दि.२७.०३.२०१३ रोजी घडली असल्याचे व त्यादिवशी धुळवड असल्याने श्रीकांत निकम मटन नेण्यासाठी खाली दुकानात आले होते परंतु गर्दी असल्याने ते त्याच्या दुकानात थांबले. साधारण ९–०० वाजताच्या सुमारास आरोपी त्याठिकाणी आले व त्यांनी फिर्यादीस 'तु धुळवडीची राख उधळलेली आमच्या मुलांना का विचारलेस तसेच, गावाची पिण्याची पाईपलाईन का अडवली, तुला मस्ती आली आहे काय, तुला जिवंतच सोडत नाही' असे सांगून खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी निलेश याने लाकडी दांडक्याने श्रीकांत यास छातीवर, बरगडीवर मारहाण केली व त्यानंतर अभिजीत याने निलेश याच्याकडील लाकडी दांडगे घेवून फिर्यादीस मारहाण केली त्यानंतर सर्व आरोपींनी पोर्चमध्ये घवून जाूवन लाथाबुक्कयांनी मारहाण केली त्यावेळेस तो भांडण सोडवत असताना आरोपी पृथ्वीराज याने तु मधे पडु नकोस असे सांगून त्याला ढकलून दिले त्यावेळी विक्रम निकम, सागर सुर्यवंशी व इतर लोक आल्याने आरोपी तेथून पळून गेले. त्याने लाकडी दांडका आर्टिकल–अ, सीडी व पेनड्राईव्ह आर्टिकल–ब व क वर असल्याचे व त्याने भारतीय पुरावा कायद्याचे ६५ब प्रमाणे नि.क्र.१३६ वर प्रमाणपत्र दिल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात आर्टिकल–अ वरील लाकडी दांडके दुकानातून जप्त केली नसल्याचे, गावातील पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनला श्रीकांत याचा विरोध असल्याचे मान्य केले आहे.

**१२.** अभियोग पक्षाने तथाकथित घटना सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.७ विक्रम निकम याची साक्ष पटलावर नोंदविली आहे. त्याने त्याच्या साक्षीत त्याच्यासमक्ष काहीही घडले नसल्याचे कथन केले आहे. सहाय्यक सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये

उत्तरसुचक स्वरुपात प्रश्न विचारले परंतु, आरोपीवरील गुन्हा शाबीत होईल असे कोणतेही कथन पटलावर आले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यास पुरक ठरत नाही.

**१३.** अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.२ तानाजी भोई, साक्षीदार क्र.३ प्रकाश माळी, साक्षीदार क्र.४ सुहास कुलकर्णी, साक्षीदार क्र.५ अजय पाटील यांची साक्ष पटलावर नोंदविली आहे. साक्षीदार क्र.२ याने त्याच्या साक्षीत दि.२९.०३.२०१३ रोजी पोलीसांनी पंचनामाकामी निकम शॉपींग सेंटरमध्ये बोलावले असल्याचे व त्याच्यासमक्ष नि.क्र.६६ प्रमाणे पंचनामा केला असल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.३ याने त्याच्या साक्षीत दि.२९.०३.२०१३ रोजी निकम शॉपी येथे पंचनामाकरिता बोलावले असल्याचे, त्यावेळेस त्याच्यासोबत तानाजी भोई व पवन निकम हजर असल्याचे व पोलीसांनी त्यांचेसमक्ष पंचनामा करुन आर्टिकल–अ वरील काठी जप्त केली असल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.४ व ५ यांनी दि.०१.०४.२०१३ रोजी पोलीसांनी निकम शॉपींग सेंटर येथे बोलावले असल्याचे व त्यांचेसमक्ष पंचनामा करुन मारहाणीचे सी.सी.टी.व्ही.फुटेज पेनड्राईव्ह व सीडी मध्ये कॉपी करुन नि.क्र.१३० प्रमाणे पंचनामा केला असल्याचे व सदरचा सीडी व पेनड्राईव्ह आर्टिकल–ब व क वर असल्याचे ओळखलेआहे. साक्षीदार क्र.४ व ५ यांनी त्याच्या साक्षीदरम्यान सीडी व पेनड्राईव्ह न्यायालयासमक्ष चालविला असता त्यामध्ये काहीही नसल्याचे मान्य केले आहे. साक्षीदार क्र.८ याने नि.क्र.६६ प्रमाणे घटनास्थळ व जप्ती पंचनामा करुन लाकडी दांडके जप्त केले असल्याचे तसेच, सीडी व पेनड्राईव्ह नि.क्र.१३० प्रमाणे जप्ती पंचनामा करुन जप्त केला असल्याचे कथन केले आहे. आरोपीतर्फे विधीज्ञांनी अभियोग पक्षाने जप्ती पंचनामे व घटनास्थळ पंचनामा सिध्द केले नसल्याचे युक्तीवाद केला परंतु, अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ते ५ यांनी त्यांचया साक्षीदरम्यान पोलीसांनी आर्टिकल–अ ते क वरील मुद्देमाल जप्त करुन पंचनामा केलेबाबत कथन केले आहे व त्यांची साक्ष नाकारण्यास पटलावर कोणतेही कारण दिसून येत नाही. त्यामुळे अभियेग पक्षाने सदर साक्षीदारांच्या साक्षीदरम्यान घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामे सिध्द केले आहे.

**१४.** अभियोग पक्षाने जरी घटनास्थळ तसेच, जप्ती पंचनामे सिध्द केले असले तरीही आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीस लाकडी दांडक्याने मारहाण करुन ईच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचवली तसेच, जिवे मारण्याची धमकी दिली याबाबी सिध्द झाले असल्याचे ग्राह्य धरता येणार नाही. साक्षीदार क्र.१ व ६ यांनी आरोपींनी साक्षीदार क्र.१ यास मारहाण केली असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यांच्या साक्षीदरम्यान अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ यास झालेल्या जखमा सिध्द केल्याचे ग्राह्य धरता येणार नाही. अभियोग पक्षास सदरच्या जखम वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षीदरम्यान सिध्द करणे आवश्यक आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१० याने वैद्यकीय अधिकारी या नात्याने प्रस्तुत प्रकरणात साक्ष दिली असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये दि.२८.०३.२०१३ रोजी श्रीकांत मारुती निकम हा तपासणीकरिता त्यांच्या दवाखान्यात आले असल्याचे, त्यांनी त्याची तपासणी केली असता त्याच्या छातीच्या उजव्या बाजुस, डोळ्याजवळ जखमा दिसून आल्याचे व त्यानंतर नि.क्र.१५९ प्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्र दिली असल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात वैद्यकीय प्रमाणपत्रात जखमींचा रंग नमुद केले नसल्याचे तसेच, श्रीकांत यास झालेल्या जखमा खाली पडल्याने देखील शक्य असल्याचे मान्य केले आहे. जरी सदर साक्षीदाराने वैद्यकीय प्रमाणपत्रात जखमांचा रंग नमुद केला नसला तरीही श्रीकांत यास झालेल्या जखमा खाली पडल्याने शक्य असल्याचे मान्य केले असले तरीही सदर साक्षीदाराने वैद्यकीय अधिकारी या नात्याने प्रस्तुत प्रकरणात साक्ष दिली आहे. त्यामुळे त्यांची साक्ष नाकारणे संयुक्तिक होणार नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१० याच्या साक्षीदरम्यान वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.१५९ निर्विवादपणे सिध्द केला आहे.

**१५.** साक्षीदार क्र.१ व ६ यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान आरोपींनी साक्षीदार क्र.१ यास मारहाण केल्याबाबत तथाकथित घटनेचा सविस्तरपणे उपापोह केला आहे. परंतु, साक्षीदार क्र.१ व ६ यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपी व फिर्यादी हे वेगवेगळ्या राजकीय गटाचे असल्याचे तसेच, फिर्यादीचा गावातील पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईलनला विरोध असल्याची बाब स्पष्ट होत आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार तथाकथित घटना ही सी.सी.टी.व्ही. मध्ये कैद झाली होती व तपासीक अंमलदाराने नि.क्र.१३० प्रमाणे

पंचनामा करुन सदरची तथाकथित घटनेचा चित्रीकरण सीडी व पेनड्राईव्ह मध्ये घेतली असल्याची बाब दिूसन येत आहे. तसेच, साक्षीदार क्र.४ व ५ यांनी सदरच्या बाबीस दुजोरा दिला आहे परंतु, सदरची सीडी व पेनड्राईव्ह न्यायालयासमक्ष चालविण्यात आली असता सदरची सीडी व पेनड्राईव्ह निरंक असल्याचे साक्षीदार क्र.४ व ५ यांनी मान्य केले आहे. तसेच, तपासीक अंमलदाराने तपासकामी सदरचे सीसीटीव्ही चे डीव्हीआर जप्त केला नसल्याची बाब अभियोग पक्षाच्या पुराव्यावरुन दिसून येत आहे व सदरची बाब अभियोग पक्षास घातक ठरत आहे.

**१६.** साक्षीदार क्र.८ याने तपासीक अंमलदार या नात्याने साक्ष दिली असून त्याने त्याच्या साक्षीदरम्यान फिर्यादीने दि.२७.०३.२०१३ रोजी नि.क्र.१४६ प्रमाणे एनसी दाखल केली असल्याचे तसेच, संग्राम पाटील यानेदेखील नि.क्र.१४७ प्रमाणे फिर्यादी विरोधात एनसी दाखल केल्याचे कथन केले आहे. नि.क्र.१४६ वरील एनसी चे अवलोकन केले असता फिर्यादीने तथाकथित घटनेबाबत प्रस्तुतची एनसी दाखल केल्याची बाब स्पष्ट होत आहे. तसेच, साक्षीदार क्र.८ याने त्याच्या उलटतपासादरम्यान अदखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्यापूर्वी न्यायालयाची परवानगी घेतली नसल्याचे मान्य केले आहे. साक्षीदार क्र.१ व ६ यांच्या कथनानुसार आरोपींनी साक्षीदार क्र.१ याला लाकडी दांडक्याने मारहाण केली आहे. परंतु, साक्षीदार क्र.१ याने जप्त लाकडी दांडका आर्टिकल–अ ने त्याला मारहाण झाली नसल्याची बाब त्याच्या साक्षीदरम्यान कथन केली आहे. याऊलट साक्षीदार क्र.६ याने आर्टिकल–अ वरील लाकडी दांडक्याने साक्षीदार क्र.१ यास मारहाण केले असल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.१ याने तथाकथित घटनेच्यावेळेस विक्रम निकम व सागर सुर्यवंशी व इतर लोकं जमा झालेबाबत कोणतेही कथन त्यांच्या साक्षीदरम्यान केली नाही. परंतु, साक्षीदार क्र.६ याने विक्रम निकम, सागर सुर्यवंशी व इतर लोक तथाकथित घनटनेच्यावेळेस जमा झाल्याचे कथन केले आहे. परंतु, साक्षीदार क्र.७ विक्रम याने साक्षीदार क्र.१ व ६ यांच्या साक्षीस कोणताही दुजोरा दिला नाही तसेच, अभियोग पक्षामार्फत सागर सुर्यवंशी व तथाकथित घटनेच्यावेळेस जमा झालेल्या इतर लोकांची साक्ष पटलावर नोंदविण्यात आली नाही. तसेच, साक्षीदार क्र.१ व ६ यांच्या साक्षीमध्ये तफावती दिसून येते आहे. त्यामुळे पटलावर तथाकथित

घटनेचे सी.सी.टी.व्ही.चे हार्ड डिस्क जप्त करण्यात आले नसल्याने, तथाकथित जप्त लाकडी दांडका देखील साक्षीदार क्र.१ याने ओळखला नसल्याने तसेच, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये असलेला वाद विचारात घेता व साक्षीदार क्र.१ व ६ यांच्या साक्षीमध्ये असलेल्या तफावतींचा विचार करता अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द केला नाही. त्यामुळे त्याचा फायदा निश्चितच आरोपींना होत आहे व वर नमुद न्यायनिवाडे प्रस्तुत प्रकरणास लागु होत आहेत त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.८ बाबत</u> :–**

**१७.** जप्त मुद्देमाल एक लाकडी दांडके, एक सीडी आणि एक “SANDISK” कंपनीचे ८ जीबी चा काळ्या रंगाचा पेनड्राईव्ह हे मुल्यहीन दर्शविल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर कायदेशिर नियमानुसार विल्हेवाट लावणेबाबत आदेश करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

**१८.** उपरोक्त चर्चेवरुन व मुद्दा क्र.१ ते ७ वरील माझ्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे निष्पन्न होते की, अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवलेले दोषारोप निःशंखपणे सिध्द केलेले नाहीत. करीता, आरोपी हे प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष सुटण्यास पात्र ठरतात. अंततः, मुद्दा क्र.८ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**– आदेश –**

१. आरोपी क्र.१. पृथ्वीराज यशवंत पाटील, आरोपी क्र.२. सुहास अशोक पाटील, आरोपी क्र.३. निलेश व्यंकटराव पाटील, आरोपी क्र.४. अभिजीत उर्फ धनाजी मोहन पाटील, आरोपी क्र.५. सचिन आप्पासाो. पाटील आणि आरोपी क्र.६. प्रदीप सुभाष पाटील यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४७, १४८, ३२६, ३२४, ३२३, ५०६ सह कलम १४९ या आरोपांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमाल एक लाकडी दांडके, एक सीडी आणि एक "SANDISK" कंपनीचे ८ जीबी चा काळ्या रंगाचा पेनड्राईव्ह हे मुल्यहीन दर्शविल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर कायदेशिर नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अंतर्गत वैयक्तिक जातमुचलका व बंधपत्र न्यायालयात सदर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.07.01 17:43:45 +0530

पलूस. (एम.ए.एम.जे. शेख)
दिनांक– ०१.०७.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस.

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 01.07.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 01.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 01.07.2026 |